# युरोप... एक विलक्षण अनुभव !



मिलिंद बाबर
फाऊंडर-चेअरमन,
मँगो हॉलिडेज्

## जगभर फिरतांना

**आमच्याबरोबर नऊ वर्षांपूर्वी युरोपची टूर केलेल्या नाशिकच्या निवृत्त शिक्षिका श्रीमती वर्षा साठे, टूर संपल्यानंतर पॅरिसच्या एअर पोर्टवर, युरोपची टूर कशी झाली हे सांगताना भावनाविवश होऊन अगदी लहान मुलासारख्या रडल्या होत्या. आयुष्यभर एक एक रूपया जमवून त्यांनी त्यांचं लहानपणीचं युरोप केवळ बघण्याचं, नव्हे, तर युरोप जगण्याचं स्वप्न आज साकार केलं होतं. त्या म्हणाल्या, ''मिलिंद, युरोपचं हे सौंदर्य आणि समृध्दी साठवून ठेवण्यासाठी हे दोन डोळे पुरत नाहीत रे. देवानं मला आणखीन दोन डोळे दिले असते तर?'' आणि मुंबई एअरपोर्टवर आल्यानंतर माझे दोन्ही हात हातात घेऊन म्हणाल्या, ''मिलिंद, युरोप बघून माझं मन भरलं नाहीए, मी परत तुझ्याबरोबर येणार... नेशील ना रे मला?**

**माझ्या सर्व पर्यटनप्रेमी वाचकांना सप्रेम नमस्कार !**

आज बरेच दिवसांनी, नव्हे बरेच वर्षांनी काहीतरी लिहावसं वाटलं, काहीतरी सांगावसं वाटलं, काहीतरी शेअर करावसं वाटलं... आणि म्हणून केलेला हा प्रयत्न.

मी गेली पंचवीस वर्ष खूप फिरलो. खूप भटकंती केली, सर्व खंडांना भेट देण्याची संधी मला मिळत गेली आणि व्यवसायानिमित्त फिरत असताना अनेक प्रकारचे लोक भेटत गेले. कोणी थोडे दिवसांचे प्रवासी तर काही कायमचे जोडले गेले. नवीन नवीन अनुभव... काही चांगले, काही वाईट, मिळत गेले. मी इतकी वर्ष आणि इतक्या वेळा जगभर फिरलो आणि त्या निमित्ताने वेगवेगळया लोकांना भेटण्याची एक दुर्मीळ संधी मला मिळत गेली.

मला भेटणारे लोक वेगवेगळया व्यावसायिक पार्श्वभूमी मधून आलेले होते. कोणी वकील, कोणी डॉक्टर, कोणी आर्किटेक्ट, कोणी मंत्री, कोणी पोलिस कमिशनर, कोणी यंग तर कोणी वयस्कर, अगणित स्त्री-पुरुष आणि सर्व वयोगटातील मुलं मुली या निमित्ताने भेटली. प्रत्येकाचे सोशल स्टेटस वेगळे, प्रत्येकाचे फायनान्शियल स्टेटस वेगळे, प्रत्येकाची शैक्षणिक किंवा सांस्कृतिक पार्श्वभूमी वेगळी, कोणी शांत तर कोणी भांडकुदळ.

कोणीही माणूस कसाही असला तरी, त्या सर्वांमध्ये मला एक गोष्ट मात्र कॉमन आढळली आणि ती म्हणजे

या सर्वांचं एकच स्वप्न होतं आणि ते म्हणजे युरोप बघण्याचं. बरेचसे लोक बऱ्याच ठिकाणी फिरलेले होते, पण तरीसुध्दा त्या प्रत्येकालाच युरोपचं एवढं प्रचंड आकर्षण होतं. तुमचं-आमचंसुध्दा बघा ना. आपल्या सर्वांनाच लहानपणापासूनच लंडन आणि पॅरिसचं प्रचंड आकर्षण असतं. आपली काही स्वप्नं असतात आणि त्या स्वप्नांमधील एक महत्वाचं स्वप्न हे फॉरेन ट्रॅव्हलचं असतं. पण फॉरेन ट्रॅव्हलमध्ये सुध्दा युरोप बघणं ही प्रत्येकाचीच टॉप प्रायॉरिटी असते.

एका ग्रीक दंतकथेनुसार युरोपा ही एक तरुण आणि सुंदर राजकन्या होती. देवांचा देव झ्युस तिच्या प्रेमात पडला. त्याने तिला पळवण्यासाठी एका सुंदर आणि धष्टपुष्ट बैलाचे रुप धारण करुन युरोपाला पाठीवर बसण्यासाठी प्रवृत्त केले. ज्या क्षणी ती त्याच्या पाठीवर बसली, त्या क्षणी त्याने तिला घेऊन तिथून धूम ठोकली व वादळी समुद्रातून पोहत जाऊन क्रिट नावाचे बेट गाठले. तिथे आल्यावर त्याने आपले खरे रुप धारण केले. झ्युसच्या या पराक्रमाने युरोपा भारावून गेली आणि त्याची राणी झाली. पुढे त्यांना ३ मुले पण झाली. या घटनेची आठवण म्हणून झ्युसनी आकाशात बैलाच्या आकाराचे नक्षत्र निर्माण केले, ज्याला आपण टॉरस म्हणून ओळखतो.

या युरोपावरुनच या सुंदर खंडाचे नाव पडले युरोप. आज पर्यटन खूप मोठया प्रमाणावर वाढलेले आहे. परंतु प्रत्येक पर्यटनवेडया माणसाचं अंतीम स्वप्न म्हणजे युरोप ! युरोप हा पर्यटनाचा महामेरु आहे. युरोपला स्वत:ची खूप मोठ्ठी सांस्कृतिक ओळख आहे. प्राचीन ग्रीक संस्कृतीपासून ते रोमन संस्कृतीपर्यंत आणि रोमन संस्कृतीपासून ते ख्रिश्चन संस्कृतीपर्यंत खूप मोठ्ठा इतिहास आहे. युरापिअन लोक हे मुळचे राजे आहेत. एके काळी त्यांनी संपूर्ण जगावर राज्य केले आहे. आपल्याला माहितच आहे की, फ्रेंच वसाहती, स्पॅनिश वसाहती, डच वसाहती, ब्रिटिश वसाहती, पोर्तुगीज वसाहती हया जगभर पसरलेल्या होत्या. परंतु पहिल्या आणि दुसऱ्या महायुध्दानंतर हया सर्व प्रगत देशांची कंबरडी मोडली गेली. त्यांच ऐश्वर्य लयाला गेलं. त्याच सुमारास जागतिक महासत्ता म्हणून अमेरिकेचा उदय झाला. खरं तर अमेरिका किंवा ऑस्ट्रेलिया सारखे संपन्न देश हे मुळचे दळीद्री. त्यावेळी, इग्लंडमध्ये गुन्हेगारी खूप वाढली होती. गुन्हेगारांना ठेवायला तुरूंग अपुरे पडत होते, म्हणून ब्रिटिश लोकांनी तिथल्या गुन्हेगारांना बोटींवर घालून ऑस्ट्रेलिया किंवा अमेरिकेला नेले, तिथली सर्व मेहनतीची किंवा खालच्या दर्जाची कामं त्यांच्याकडून करवून घेण्यासाठी. अशाप्रकारे तिथे आलेले लोक मूळचे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे होते. राजा आणि भिकारी जसे अगदी तसेच. कालांतरानं हे भिकारी श्रीमंत होत गेले आणि जे मुळचे श्रीमंत होते, ते महायुध्दामुळे भिकेला लागले. परंतु जसं राजा जरी भिकेला लागला तरी त्याचं मूळ रक्त राजघराण्याशी संलग्न असते आणि ते शेवटपर्यंत त्याच्या वागण्या बोलण्यात दिसत राहते, तसंच युरोपचं आहे. परिस्थिती खराब आली तरी त्यांचा Class हा Classच राहिला.



**Abduction of Europa** **युरोपा** *Painting by:* Marie Pierre, *1750*

मी सर्व खंड पाहिले, पण युरोपची सर कुणालाच येणार नाही. युरोप समृध्द आणि संपन्न तर आहेच पण त्याच्या इतकी विविधता कदाचित तुम्हाला अभावानेच सापडेल. युरोप नुसता सुंदर नाही, नुसता समृध्द नाही, तर त्याला खूप मोठ्ठा इतिहास आहे. असं म्हणतात की, युरोपमधील प्रत्येक दगडाला इतिहास आहे. प्रत्येक गल्लीला लगडलेली एक परंपरा आहे. प्रत्येक नाक्याला आपली एक ओळख आहे. इटली म्हणजे तर आर्टस्, कल्चर आणि पेंटिंगची खाणच आहे. पॅरिसची स्टाईल, तिची फॅशन, तिचं ग्लॅमर हे ॲमेझिंगच आहे. व्हेनिससारखे अनोखे युनिक कॅरेक्टरीस्टिक्स् असलेले रोमँटिक शहर, ज्याला चार्लस् डिकन्सनी "Strange and beautiful dream on water which can never be copied" म्हणून संबोधलं होतं. सायन्स आणि टेक्नॉलॉजीचा युरोपिअन लोकांनी करुन घेतलेला वापर पाहिला तर थक्क व्हायला होतं. टीजीव्ही ट्रेन जिला जगातली फास्टेस्ट ट्रेन म्हणतात, जी खरोखरीच वाऱ्याशी स्पर्धा करत धावते. किंवा शंभर वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी बांधलेली टयुब किंवा अंडरग्राऊंड ट्रेन म्हणजे ब्रिटीश दूरदृष्टीचं उत्कृष्ट उदाहरण. जवळपास ११ मजले उंच इमारती एवढे खोल खणून, एका वर एक अशा अनेक ट्रेन्स्च्या लाईन्स टाकून केलेला चमत्कार किंवा युंगफ्राव या स्वित्झर्लंडच्या ११००० फुटांवरील बर्फाच्छादित शिखरावर जाण्यासाठी शंभर वर्षापूर्वीच बांधलेली ट्रेन लाईन असो, सारंच केवळ अप्रतिम.

युरोप बघण्याचं भाग्य एका सर्व्हेप्रमाणे, जगातल्या फक्त २% लोकांनाच मिळतं. युरोप बघण्याचा खरोखरच योग यावा लागतो. युरोप सगळयांच्या नशिबात नसतो, हे खरंच. आपल्या आयुष्यात असे फार थोडे क्षण असतात, जे आपण अगदी काळजीपूर्वक जपून ठेवलेले असतात किंवा ज्यांच्या आठवणी आजही कित्येक वर्षानंतरसुध्दा, त्या क्षणांचा सुखद गारवा देऊन जातात. माझी अशीच एक आठवण आज मी तुम्हाला सांगून माझं पुराण इथं संपवणार आहे.

मी SOTC मध्ये असताना, थायलंड, मलेशिया, सिंगापूर, मॉरिशस वगैरे ठिकाणी फिरलो होतो, पण माझं स्वप्न मात्र युरोपला जाण्याचं होतं. युरोपची टूर हे सगळयात DIFFICULT DESTINATION मानलं जायचं, कारण त्यावेळी तिथे प्रत्येक देशाची करन्सी वेगळी असायची, प्रत्येक देशाचा व्हिसा वेगळा असायचा, प्रत्येक बॉर्डरवर चेकिंग व्हायचं. लांबचा प्रवास, २४ तास तुम्ही ग्राहकांसमोर असता. त्यामुळे इतर ठिकाणी चांगला परफॉर्मन्स करणाऱ्यांनाच युरोपला जायची संधी मिळायची आणि मला ही संधी चांगल्या परफॉर्मन्समुळे पहिल्याच वर्षी मिळाली. जेंव्हा मला कळलं की, मी आता युरोपला जाणार, तेंव्हा माझा आनंद गगनात मावेना.

शेवटी जाण्याची तारीख नक्की झाली. व्हिसाचे सर्व सोपस्कार पार पडले व ठरल्याप्रमाणे आम्ही मुंबईहून एअर फ्रान्सच्या विमानाने युरोपकडे झेपावलो. या नऊ तासांच्या प्रवासात रात्र असूनसुध्दा मला एक्साईटमेंटमुळे झोपच लागली नाही. तुम्हाला माहितीच असेल की, प्रत्येक देशाची एअर लाईन, त्या त्या देशामार्गे पुढे जाते. एअर फ्रान्स पॅरिसवरुन, लुफ्तान्सा फ्रँकफर्ट वरुन, KLM ॲमस्टरडॅमवरुन किंवा एमिरेटस् दुबईवरुन. आमची टूर सुरु होत होती, लंडनला. पण एअर फ्रान्सचे विमान असल्यामुळे, आम्हाला ते पॅरिसला बदलून तिथून दुसरं विमान धरुन लंडनला जायचं होतं.

पॅरिसला आमचं विमान सकाळी सात वाजता लॅण्ड झालं. तिथे आम्हाला फक्त या विमानातून उतरुन, दुसऱ्या विमानात बसायचं होतं, पण माझ्यासाठी मात्र तो 'Experience of a life time' होता.

मला लहानपणापासूनच पॅरिसचे इतके आकर्षण होतं की, विमानातून उतरताना जेंव्हा मी माझं पहिलं पाऊल या मायानगरीत टाकलं, तेंव्हा माझ्या अंगावर सरसरून काटा आला. मला खरंच वाटत नव्हतं की, मी पॅरिसमध्ये उतरलोय. नील आर्मस्ट्राँगलासुध्दा चंद्रावर पहिलं पाऊल टाकताना कदाचित एवढा आनंद झाला नसेल.

माझी ती एक्साईटमेंट आणि तो रोमांचकारी अनुभव माझ्या मनाच्या कोपऱ्यात मी आज २५ वर्षांनंतरसुध्दा अतिशय हळूवारपणे जपून ठेवला आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात काही कोडॅक मुव्हमेंटस् असतात, तशीच माझी ही एक कोडॅक मुव्हमेंट Experience of a life time ! ठरली.

त्यावेळी मला झालेला आनंद, ती एक्साईटमेंट मला माझ्या या व्यवसायामध्ये खूपच उपयोगी पडली. कारण, मी माझा 'तो अनुभव' माझ्या प्रत्येक ग्राहकाच्या मनामध्ये शोधत असतो आणि त्याला तो मिळावा म्हणून मनापासून प्रयत्न करत असतो, झटत असतो.

आमच्याबरोबर नऊ वर्षांपूर्वी युरोपची टूर केलेल्या नाशिकच्या निवृत्त शिक्षिका श्रीमती वर्षा साठे, टूर संपल्यानंतर पॅरिसच्या एअर पोर्टवर, युरोपची टूर कशी झाली हे सांगताना भावनाविवश होऊन अगदी लहान मुलासारख्या रडल्या होत्या. आयुष्यभर एक एक रूपया जमवून त्यांनी त्यांचं लहानपणीचं युरोप केवळ बघण्याचं नव्हे, तर युरोप जगण्याचं स्वप्न आज साकार केलं होतं. त्या म्हणाल्या, ''मिलिंद, युरोपचं हे सौंदर्य आणि समृध्दी साठवून ठेवण्यासाठी हे दोन डोळे पुरत नाहीत रे. देवानं मला आणखीन दोन डोळे दिले असते तर?'' आणि मुंबई एअरपोर्टवर आल्यानंतर माझे दोन्ही हात हातात घेऊन त्या म्हणाल्या, ''मिलिंद, युरोप बघून माझं मन भरलं नाहीए, मी परत तुझ्याबरोबर येणार... नेशील ना रे मला?'' आणि मी सुध्दा साश्रू नयनांनी त्यांना परत युरोपला घेऊन जाण्याचं आश्वासन देऊन निघालो, माझ्या पुढच्या युरोप वारीला !

साठे काकुंसारख्या असंख्य मराठी माणसांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाची जाणीव किंवा कृतज्ञता म्हणून आपणास फक्त सर्वोत्तमच देण्यासाठी मी, मिलिंद बाबर पूर्णपणे बांधील आहे.

आता आपण फक्त बॅग भरा व बाकीचे सर्व काही... हो अगदी सर्व काही... व्हिसा मिळवून ते अगदी मुंबई विमानतळावर परत येईपर्यंत, सर्व काही आमच्यावर सोपवा.

: क्रमश :

milind@mangoholidays.in

'मँगो' स्पेशल इंटरनॅशनल आणि डोमेस्टिक टूर्स

| Europe | America | Australia & New Zealand |
| South Africa | Dubai | South East Asia | Mauritius |
| Kerala | Rajasthan | Madhya Pradesh | Himachal |

www.mangoholidays.in

Mango® HOLIDAYS
Experience of a Lifetime !

ADVT.